महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

बुधवार ■ ०६ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# शहापूर तालुक्यात कुपोषीत बालकांची समस्या कायमच !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भरत उबाळे**

**शहापूर, ता. 5 :** तालुक्यात बालकांच्या कुपोषणाच्या समस्येने चांगलेच डोके वर काढले आहे. ३५ वर्षांपासून बालकांचा कुपोषणाचा प्रश्न सतावत असूनही हे कुपोषण पूर्णतः रोखण्यात ठाणे जिल्ह्याची सरकारी यंत्रणा निष्फळ ठरली आहे. मागील जून महिन्यात घेण्यात आलेल्या नोंदीमध्ये १५ बालके अति तीव्र कुपोषित आढळून आली आहेत. तर ४०२ बालके तीव्र कुपोषित आढळल्याची नोंद घेण्यात आली आहे.

शहापूर तालुक्यातील वाड्या-वस्त्यांमध्ये आजमितीसही अठराविश्व दारिद्र्य पाहायला मिळत आहे. रस्ते, पाणी, वीज, आरोग्य आणि शिक्षण अशा मूलभूत गरजांशी झगडत जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या हाताला काम नाही. रोजगार उपलब्ध नसल्याने दोन वेळचे पोट भरण्याची भ्रांत असल्यामुळे येथील वाड्या-वस्त्यांमध्ये आरोग्याचा आणि सोबतच बालकांच्या कुपोषणाचा प्रश्न अद्यापही कायमचा निकाली निघालेला नाही. बालकांच्या कुपोषणाच्या समूळ उच्चाटनासाठी सरकार स्तरावरून दरवर्षी विविध योजनांची घोषणा करण्यात येते; मात्र या योजना शेवटच्या घटकांपर्यंत पोहचत नसल्याने हा प्रश्न अजूनही सतावतच आहे. विशेष म्हणजे, कुपोषणाच्या प्रश्नांवर करावयाचे उपाय आणि घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन तसेच जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. यासोबतच रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शहापूर तालुक्याच्या आदिवासी, ग्रामीण भागात प्रयत्न होण्याची नितांत आवश्यकता निर्माण झाली आहे.

**कुपोषित बालकांची आकडेवारी**

| वर्ष | महिना | अतितीव्र | मध्यम |
|---|---|---|---|
| २०२४ | एप्रिल | १४ | २४३ |
| | मे | १६ | २६३ |
| | जून | १७ | २७४ |
| २०२५ | एप्रिल | १२ | ३१७ |
| | मे | १५ | २३८ |
| | जून | १५ | ४०२ |

**अनेक वाड्या-वस्त्या अंगणवाड्याविना**

येथील महिला व बालकल्याण यंत्रणा बालकांच्या आरोग्यासाठी अंगणवाड्यांमधून शून्य ते पाच वर्षे वयोगटातील बालकांची तपासणी करते. त्यानंतर वजन व उंचीनुसार कुपोषणाचे वर्गीकरण केले जाते. अंगणवाड्यांमधून बालकांना पौष्टिक आहारही दिला जातो. अनेक वाड्या-वस्त्यांमध्ये तर अंगणवाड्याच नाहीत. तेथे पौष्टिक आहार आणि आरोग्य तपासणी मिळणेही दुरापास्त झाले आहे.

कुपोषित बालकाचे पालक कुपोषणावरील उपचारांसाठी रुग्णालयात हेलपाटे घालण्याचा कंटाळा करतात. रुग्णालयातून दिलेल्या औषधांचाही योग्य वापर करत नाही. वैद्यकीय उपचारांकडे पाठ फिरवत असल्याने ज्या कुटुंबांत कुपोषित बालक आहे. ते कुटुंब कुपोषणाच्या प्रश्नावर मात करू शकलेले नाही.

**प्रत्यक्ष वाड्या-वस्त्यांवर भेटी आवश्यक**

शहापूर तालुक्यात महिला आणि बालविकास विभागाचे दोन प्रकल्प आहेत. त्यानुसार शहापूर प्रकल्पात २९७, डोळखांब प्रकल्पात २९१ याप्रमाणे तालुक्यात एकूण ५८८ अंगणवाड्या आहेत. तितक्याच सेविका व मदतनीस कार्यरत आहेत. त्यांच्याकडून आरोग्य तपासणी करणे आणि पौष्टिक आहार देण्यावर भर दिला जातो. मात्र, तरीही कुपोषण समस्या आटोक्यात येत नाही. फक्त अंगणवाड्यांवरच निर्भर राहणे कामाचे उरलेले नाही. त्यासाठी महिला व बालकल्याण विभाग आणि आरोग्य यंत्रणेने थेट वाड्या-वस्त्यांमध्ये जाऊन या प्रश्नावर काम करण्याची गरज आहे.






## पोलीस आणि पालिकेची

# टिटवाळ्यातील पान टपऱ्यांवर कारवाई



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - टिटवाळ्यातील बेकायदा बांधकामे, फेरीवाले यांच्यावर कारवाईचा बडगा सुरू असतानाच, कल्याण डोंबिवली पालिकेच्या अ प्रभागाने टिटवाळा पोलिसांच्या साहाय्याने शहरात नशामुक्त अभियान मोहीम मंगळवारपासून सुरू केली या मोहिमेंतर्गत शाळांच्या परिसरात पान टपऱ्या चालवून त्या माध्यमातून प्रतिबंधित गुटखा सदृश्य सुगंधित वस्तू विक्री करणाऱ्या पान टपरी चालकांच्या टपऱ्या पालिका आणि पोलिसांनी बंद केल्या.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील अनेक पान टपरी चालक नियमितच्या पान विक्री बरोबर प्रतिबंधित गुटखा सदृश्य वस्तू विक्री करत असल्याचे पोलिसांनी वेळोवेळी शहराच्या विविध भागात घातलेल्या छाप्यांवरून उघड केले आहे. बहुतांशी तरूण पीढी अलीकडे प्रतिबंधित गृटखा, गांजा सेवनाकडे वळत आहे.

डोंबिवलीत अलीकडेच एका शाळेतील विद्यार्थी शाळेत गांजा आणि ई सिगारेटची हाताळणी करत असल्याचे निष्पन्न झाले होते. अनेक गांजा तस्कर आपण पोलिसांच्या तावडीत सापडू नये म्हणून शाळकरी विद्यार्थी, त्यांचे दप्तर यांचा गांजा वहनासाठी वापर करतात. असे प्रकार यापूर्वी घडले आहेत. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी मागील वर्षापासून शहरात नशामुक्त अभियाना चालवून गांजा तस्कर, अंमली पदार्थ तस्कर यांचे अड्डे मोडून काढले आहेत.

शाळांच्या परिसरात पान टपऱ्या असू नयेत असा शासनाचा नियम आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करून टिटवाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस कर्मचारी, अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी मंगळवारी सकाळपासून संयुक्तपणे टिटवाळ्यातील निमकर नाका ते टिटवाळा रेल्वे स्थानकां दरम्यान विशेष मोहीम राबवून शाळांच्या परिसरातील पान टपऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

शाळांच्या परिसरात पान टपऱ्या असू नयेत असा शासनाचा नियम आहे. या सगळ्या गोष्टींचा विचार करून टिटवाळा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस कर्मचारी, अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी मंगळवारी सकाळपासून संयुक्तपणे टिटवाळ्यातील निमकर नाका ते टिटवाळा रेल्वे स्थानकां दरम्यान विशेष मोहीम राबवून शाळांच्या परिसरातील पान टपऱ्यांवर कारवाई करण्यात आली.

या पान टपऱ्यांच्या माध्यमातून तंबाखू, गुटखा विक्री केली जात असल्याचा पोलिसांना संशय आहे. शाळांच्या परिसरात पान टपऱ्या असल्याने विद्यार्थ्यांचा वावर याठिकाणी राहतो. काही गांजा, अंमली पदार्थ विक्री करणारे तस्कर अलीकडे शाळांच्या परिसरात सापळा लावून विद्यार्थ्यांना पैशाचे आमिष दाखवतात आणि गांजाचे वहन करण्यास भाग पाडतात. हे प्रकार टाळण्यासाठी टिटवाळ्यात शाळांच्या परिसरात असलेल्या पान टपऱ्यांवर पालिका आणि पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई सुरू केली आहे. या कारवाईमुळे पालक, शिक्षकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# बविआ आणि ठाकरे सेनेला धक्का

## वसई विरारमधील बड्या नेत्यांचा भाजपात जाहीर प्रवेश !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**विरार :** भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद चव्हाण यांच्या व वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित व राजन नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत उबाठा गटातील व बहुजन विकास आघाडी पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केल्याने बविआ आणि शिवसेनेला धक्का बसला आहे.

आधी राष्ट्र, नंतर पक्ष आणि शेवटी स्वतः" या राष्ट्रहितप्रधान विचारधारेवर विश्वास ठेवत व पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र दादा चव्हाण यांच्या नेतृत्वावर श्रद्धा ठेवून वसई विधानसभा मतदारसंघातील उबाठा गटातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात आज दिनांक ०५ ऑगस्ट २०२५ रोजी भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यालय नरिमन पॉईंट मुंबई येथे भव्य प्रमाणात जाहीर प्रवेश केला.

या पक्षप्रवेश कार्यक्रमात भाजप महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित व नालासोपराचे आमदार राजन नाईक यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.

आज पक्षप्रवेश केलेल्या प्रमुख मान्यवरांमध्ये शिवसेनेचे माजी जिल्हा प्रमुख पंकज देशमुख, निलेश भानुसे वसई शहर समन्वयक, सुनील मिश्रा - तालुका अधिकारी, युवासेना, प्रकाश देवळेकर उपतालुका प्रमुख, वैभव म्हात्रे उपजिल्हा अधिकारी, युवासेना, योगेश भानुसे - उपशहर प्रमुख, संतोष घाग, नितीन ठाकूर, संतोष कनोजिया, दिनेश भानुशाली बहुजन विकास आघाडीचे पदाधिकारी आनंद पाटील सामाजिक कार्यकर्ते यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी जोशात भाजपा प्रवेश केला.

या कार्यक्रमाला आमदार विक्रांतजी पाटील, माधवीताई नाईक, आमदार राजन नाईक, नवनाथ बन, वसई-विरार शहर भाजपा जिल्हा अध्यक्षा प्रज्ञा पाटील, महेंद्र पाटील, व सर्व मंडळ अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पक्षप्रवेशाने वसईतील भाजपाची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाली असून, आगामी काळात वसई विरार शहर महानगरपालिका मध्ये भाजपचा विजय अधिक निश्चित मानला जात आहे.

# ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा बदलापूर वांगणी परिसरातील दिव्यांगासाठी अभिनव उपक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




**कल्याण:** सर्वाधिक वास्तव्यास असलेल्या बदलापूर जवळील वांगणी येथील दिव्यांग बांधवासाठी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी अभिनव असा उपक्रम राबविण्याचा निश्चिय केला असून त्याची प्रत्यक्षात पाहणी करण्यासाठी ते आज या परिसरात आले होते.ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे सर्वात हटके असे सीईओ आहेत, अतिशय हुशार, चतुर, आणि प्रत्यक्षात जबाबदारी स्वीकारुन तशी कृती करणारे उच्च पदस्थ अधिकारी म्हणून ते जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत, जिल्ह्यातील बदलापूर जवळील वांगणी या परिसरात सर्वाधिक दिव्यांग, त्यामध्ये अंध दिव्यांग वास्तव करतात, त्यांचे उपजिवेकेचे साधन, तसेच त्यांना विविध ट्रेनिंग देऊन स्वतः च्या पायावर उभे करण्यासाठी त्यांच्या साठी टिडीआरसी उभारणीसाठी जागेची पडताळणी, पाहणी करण्यासाठी ते आज सकाळी येथे आले होते, त्यांच्या सोबत प्रकल्प संचालक श्रीमती छायादेवी शिसोदे मॅडम, अंबरनाथ बीडिओ पंडित राठोड, आदी मान्यवर होते. यानंतर त्यांनी बेलवली येथील उमेद कार्यालयाला भेट दिली, बचत गटाच्या महिलांना त्यांनी बनवलेल्या वस्तू ची विक्री करण्यासाठी हक्काचे दालन असावे यासाठी जागेची पाहणी करून शासनास प्रस्ताव सादर करायचा आहे त्यासाठी देखील मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी बेलवली येथील उमेद कार्यालयात जावून परिस्थिती चा आढावा घेतला. त्यां












## वाहतूक कोंडीच्या निराकरणासाठी

# नवनियुक्त जिल्हाधिकारी ॲक्शन मोडमध्ये

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,दि.05**

ठाणे आणि परिसरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त असून सर्व यंत्रणांनी समन्वयाने हा परिसर वाहतूक कोंडीमुक्त करावा. तसेच रस्ते तातडीने दुरुस्त करून खड्डे मुक्तीसाठी उपलब्ध असलेले उत्तम तंत्रज्ञान वापरावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवार, दि.4 ऑगस्ट 2025 रोजी ठाण्यातील वाहतूक कोंडीसंदर्भात सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत दिले.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्णनाथ पांचाळ यांनी सोमवार, दि.4 ऑगस्ट रोजी ठाणे घोडबंदर रोडवरील गायमुख घाटामध्ये होणाऱ्या वाहतूक समस्येबाबत आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात तात्काळ स्थळपाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, ठाणे महानगरपालिकेचे शहर अभियंता प्रशांत सोनाग्रा, कार्यकारी अभियंता संजय कदम, तहसिलदार उमेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजीव वानखेडे, शाखा अभियंता प्रसाद सनगर व इतर संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

स्थळपाहणी झाल्यानंतर जिल्हाधिकारी श्री.पांचाळ यांनी याविषयी सविस्तर चर्चा व पुढील ॲक्शन प्लॅन तयार करण्यासाठी संबंधित सर्व अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात रात्री उशिरा बैठक घेतली. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील, मिरा भाईंदर वाहतूक पोलीस निरिक्षक सागर इंगोले व इतर अधिकारी देखील उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री.पांचाळ म्हणाले की, रस्ते दुरुस्ती / वाहतूक कोंडी संदर्भात उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शुक्रवार, दि.08 ऑगस्ट 2025 पासून रस्ते वाहतूक अंशतः ब्लॉक करण्यात येणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, मीरा भाईंदर बांधकाम विभाग, ठाणे महानगरपालिका बांधकाम विभाग, वाहतूक विभाग, प्रादेशिक परिवहन विभाग, वनविभाग अशा सर्व विभागांनी आपापसात आवश्यक तो समन्वय राखून एकजुटीने या समस्येचे निराकरण पुढील पंधरा दिवसाच्या आत कोणत्याही परिस्थितीत करावे. यादरम्यान संभाव्य पाऊस, वाहनांची वाहतूक या सर्व बाबींच्या अनुषंगाने विचारपूर्वक आवश्यक त्या उपाययोजना तातडीने कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री.पांचाळ यांनी दिले. तसेच ही सर्व कामे रस्ते सुरक्षा समितीच्या समन्वयाने तसेच अपघात होवू नये यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा अवलंब करून मार्गी लावण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेला मुदतवाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** येत्या खरीप हंगामात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा याकरीता सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. खरीप हंगाम 2025 मध्ये आतापर्यंत कोकण विभागातील 88 हजार 194 शेतकऱ्यांनी योजनेत भाग घेतला आहे. योजनेतील सहभागाकरिता बिगरकर्जदार शेतकऱ्यांना 14 ऑगस्टपर्यंत व कर्जदार शेतकऱ्यांना 30 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सुधारीत प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणीपासून ते काढणीपर्यंत विविध नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांच्या उत्पादकतेमध्ये आलेली घट गृहीत धरून विमा संरक्षण लाभणार आहे. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना विमा हप्ता भरावा लागेल. ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात भात पीकाकरिता विमा संरक्षित रक्कम 61 हजार असून शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता प्रति हेक्टरी 457.50 रुपये असून नाचणी पीकाकरिता 35 हजार विमा असून शेतकऱ्यांना 87.50 रुपये भरावयाचे आहेत. रायगड व सिंधुदुर्ग जिल्हात नाचणीकरिता 40 हजारांचे विमा संरक्षित रक्कम असून शेतकऱ्यांना 100 रुपये विमा हप्ता भरायचा आहे.

# रायगड जिल्ह्यात पिक विमा योजनेला मुदतवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : रायगड जिल्ह्यात भात व नाचणी पिके अधिसूचित असून या योजनेत सहभागाची अंतिम मुदत दि.31 जुलै 2025 अशी निश्चित करण्यात आलेली होती. शेतकऱ्यांना या योजनेत सहभागी होण्यासाठी येणाऱ्या प्रशासकीय व तांत्रिक अडचणी विचारात घेऊन योजनेत सहभागासाठी पुरेसा कालावधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने, केंद्र शासनाने प्रधानमंत्री पिक विमा योजनेतंर्गत खरीप हंगाम 2025 मध्ये ऑनलाईन विमा अर्ज भरण्यास बिगर कर्जदार शेतकऱ्यांना दि. 14 ऑगस्ट 2025 पर्यंत व कर्जदार शेतकऱ्यांना दि. 30 ऑगस्ट 2025 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून सर्व शेतकऱ्यांनी योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

राज्यात उत्पादनावर आधारित पीक विमा योजना खरीप 2025 व रब्बी 2025-26 या एक वर्षाकरिता अधिसुचित यंत्रातील अधिसुचित पिकांसाठी विमा क्षेत्र घटक धरुन राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. भात पिकासाठी प्रति हेक्टरी 45.7.50 रु. व नाचणी पिकासाठी 100 रु. इतका विमा रायगड जिल्ह्यासाठी आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, आधारकार्ड, अधिसूचित पिकाचे पेरणी केलेले स्वंयघोषणापत्र, भाडेपट्टा करार असलेल्या शेतकऱ्यांचा करार नामा, संमती पत्र, बँक पासबुक प्रत इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहे.

# कोकण वसाहत पुनर्वसन बाधितांचे उपोषण सुरूच

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : कल्याण पश्चिमेतील म्हाडा अंतर्गत कोकण वसाहत रहिवाशांच्या पुनर्वसन प्रकल्पात विकासकाने 15 वर्षे होऊन देखील हक्काची घरे दिली नाहीत. घरभाडे दिले नाही. यासाठी विकासकावर गुन्हे दाखल करण्यासाठी संदर्भीत बाधित रहिवाशांना हक्काची घरे मिळण्यासाठी गेल्या तीन दिवसांपासून माजी आमदार नरेंद्र पवार यांनी बाधित रहिवाशांसमवेत उप जिल्हाधिकारी कार्यालया लगत बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आहे. आज तिसऱ्या दिवशी देखील त्यांचे हे आमरण उपोषण सुरूच असून या उपोषणकर्त्यांमधील काहींची प्रकृती खालावली आहे. तर आमचे जे व्हायचे ते इथेच होईल, आम्हाला न्याय मिळाल्याशिवाय उठणार नसल्याची भूमिका या आंदोलनकर्त्यांची असल्याचे नरेंद्र पवार यांनी सांगितले.

आमरण उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी प्रसिद्धी माध्यमाना सामोरे जाताना पवार यांनी सांगितले की, प्रामुख्याने बिल्डरने 15 वर्षे पासून घरे दिलेली नाहीत 4 वर्षांपासून घरभाडी दिली नाहीत. शिवाय बँकेचे 350 कोटी लोन घेतले, सेलेबेलचे 150 कोटी एंकदरीत 500 कोटी आले ते कुठे हे शोधण्यासाठी, यासाठी बिल्डरवर गुन्हे दाखल करावेत, चौकशी करावी. तसेच यात कोणचे हात बरबटले आहेत, ते चौकशीत सामारे येईल. या संदर्भात आमची आग्रही मागणी बिल्डर, बिल्डरचे पार्टनर, त्यांना मदत करणारे जुन्या कमिटीतील सदस्य यांच्यावर गुन्हे दाखल करीत अटक करावी, चौकशी करावी.

मुख्यमंत्र्यांनी पोलीस आयुक्तांना फोन करून सांगितले, तरी देखील कारवाई होत नाही. शासन सांगते परंतु प्रशासन हालत नाही, कुठल्याही प्रकारचा एफआयआर केला जात नाही. त्यामुळे आम्ही आमरण उपोषणाला बसलो आहोत. 3 दिवसांच्या उपोषणात माझी देखील प्रकृती ढासळत आहे. माझ्या बरोबर बसलेल्यांची प्रकृती बिघडत आहे. डॉक्टरांनी गोळया घेण्यास सांगितले आहे, परंतु आम्ही निश्चियावर ठाम असून पाण्याचा घोट देखील पिणार नाही. आम्हाला काय व्हायचे ते होऊदे. अद्याप देखील प्रशासनाच्या वरिष्ठ पातळीवर दखल घेतली जात नसल्याची खंत नरेंद्र पवार यांनी व्यक्त केली.

या आंदोलन स्थळी भाजपा जिल्हा अध्यक्ष नंदू परब यांनी भेट देत विचारपूस केली. भाजपा प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी फोन करून विचारपूस केली आहे. तर आमरण उपोषणाला बाधित कुटुंबातील महिला वर्गाने रडत रडत आमची फरफट, वनवास कधी थांबणार आम्हाला आमची हक्काची घरे कधी मिळणार अशी आर्त साद दिली आहे.

# डॉ. देवीदास बामणे यांना छत्रपती राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पेण चे अध्यक्ष, हिंदी विभागाचे कवी डॉ.देवीदास कल्लाप्पा बामणे ' यांना नैसर्गिक मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरम यांच्या वतीने छत्रपती राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार देऊन नुकतेच गौरवण्यात आले आहे.

छत्रपती राजश्री शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून मानवाधिकार सुरक्षा परिषद फोरम यांच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील छत्रपती राजश्री शाहू महाराज समाज भूषण पुरस्कार नंदूरबार येथे सुरक्षा परिषद फोरम राष्ट्रीय अध्यक्ष गोरखा देवरे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला आहे.

शैक्षणिकदृष्ट्या काम करत असताना सामाजिक कार्यात सुद्धा इतक्याच हुरहूरने काम करत असल्याने अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत त्यातच हा पुरस्कार माझ्यासाठी सन्मानाचा आहे असे डॉ.देवीदास बामणे 'यांनी सांगितले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे माजी अध्यक्ष ॲड.बापुसाहेब नेने, अध्यक्ष ॲड.मंगेश नेने, खजिनदार संजय कडू , कार्याध्यक्ष प्रशांत ओक, प्राचार्य डॉ.एस.बी.धारप व इतर पदाधिकारी तसेच पत्रकार बंधू यासह समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींनी यावेळी अभिनंदन केले.

## गीतासार

### अध्याय १८

### मोक्षसंन्यासयोगः

मुक्तसङ्गोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ।
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्त्विक उच्यते ॥ १८-२६ ॥

जो कर्ता आसक्ती न बाळगणारा, मी, माझे न म्हणणारा, धैर्य व उत्साहाने युक्त, कार्य सिद्ध होवो वा न होवो, त्याविषयी हर्षशोकादी विकारांनी रहित असलेला असतो – तो सात्त्विक म्हटला जातो. ॥ १८-२६ ॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥ १८-२७ ॥

जो कर्ता आसक्ती असलेला, कर्मांच्या फळांची इच्छा बाळगणारा, लोभी, इतरांना पीडा देण्याचा स्वभाव असलेला, अशुद्ध आचरणाचा आणि हर्ष-शोक यांनी युक्त असतो, तो राजस म्हटला जातो. ॥ १८-२७ ॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः । विषादी दीर्घसूत्री च कर्ता तामस उच्यते ॥ १८-२८ ॥

जो कर्ता अयुक्त, अशिक्षित, घमेंडखोर, धूर्त, दुसऱ्यांची जीवन-वृत्ती नाहीशी करणारा, शोक करणारा, आळशी आणि दीर्घसूत्री असतो, तो तामस म्हटला जातो. ॥ १८-२८ ॥

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु । प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनञ्जय ॥ १८-२९ ॥

हे धनंजया (अर्थात अर्जुना), आता बुद्धीचे व धृतीचेही गुणांनुसार तीन प्रकारचे भेद माझ्याकडून पूर्णपणे विभागपूर्वक सांगितले जात आहेत, ते तू ऐक. ॥ १८-२९ ॥

# वृद्धाश्रमातील महिलांना शिक्षकांचा मदतीचा हात



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कवी दत्ता हलसगीकर यांच्या 'ज्यांची बाग फुलून आली, त्यांनी दोन फुले द्यावीत... ज्यांचे सूर जुळून आलेत, त्यांनी दोन गाणी द्यावीत... या काव्य पंक्तीप्रमाणे उल्हासनगर येथील शांताई वृद्धाश्रमातील वृद्धांना काही मूलभूत सुविधांची आवश्यकता असल्याचे समजताच संचालिका मनीषा झेंडे यांच्या आवाहनाला साद देत महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना, ठाणे शहर व श्रीमती सावित्रीदेवी थिराणी विद्या मंदिर, ठाणे येथील शिक्षकांच्या संयुक्त विद्यमाने महिला श्रमिक संघ संचालित शांताई वृद्धाश्रम उल्हासनगर या संस्थेस सामाजिक बांधिलकी जोपासत शिक्षकांनी संस्थेला भेट देऊन पंधरा बेडची व्यवस्था करून वृद्ध महिलांना मदतीचा हात दिला व वृद्धांशी संवाद साधला.

यासाठी संघटनेचे जिल्हा सचिव मनोहर पाटकर, शहर अध्यक्ष सतिश ठाणगे, उपाध्यक्ष प्रदीप पाटील, कोषाध्यक्ष सुनिल जाधव, विवेकानंद फौंडेशनचे अध्यक्ष शरद वांगड, सचिव कल्याण मिस्त्री, थिराणी विद्यामंदिर येथील संजय परदेशी, चंद्रशेखर चौधरी, गोकुळ अलई, भरत तायडे, नंदू खाडे, मारुती कचरे, धोंडीराम विरकर, महेश बेलकर तसेच बदलापूर येथील समाजसेवक हरिश्चंद्र अमृतकर यांनी सहकार्य केले.

# वासिंदमध्ये अवयवदान जनजागृती अभियान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : अवयवदान विषयी जनजागृती व माहिती व्हावी यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने अवयवदान जनजागृती अभियान हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

दरवर्षी भारतामध्ये हजारो रुग्ण अवयवांच्या प्रतिक्षेत असतात. परंतु उपलब्ध अवयवांचा टक्का अत्यंत कमी आहे. त्यामुळे अवयवदान हे मृत्यूपलीकडचं जीवनदान असून या अनुषंगाने नागरीकांमध्ये जनजागृती होऊन माहिती मिळावी यासाठी आरोग्य विभागाने पुढाकार घेऊन हा उपक्रम हाती घेतला आहे. तर या अवयवदान विषयी जनजागृती अभियान हाती घेतले असून दि. 3 ते 13 ऑगस्ट 2025 दरम्यान हा उपक्रम संपूर्ण प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालय माध्यमातून राबविण्यात येणार असल्याचे वासिंद प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ रुपाली शेडगे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, या उपक्रमात समाज माध्यमांवर ऑनलाइन, आभासी व्याख्यान, आरोग्य केंद्र, सर्व रुग्णालयांमध्ये क्युआर कोड पोस्टर प्रदर्शन, ओपीडी प्रतिक्षालयात रुग्णालय प्रमुख रुग्णांकरीता छोटेखानी व्याख्यान, सार्वजनिक ठिकाणी जनजागृती कार्यक्रम, शाळा, रुग्णालयात प्रतिज्ञा भिंत किंवा वृक्षारोपण, सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे करीता अवयवदान चर्चा सत्र, महाविद्यालयांमध्ये पोस्टर, रंगोली स्पर्धा, शाळांमध्ये निबंध, चित्रकला स्पर्धा, स्थानिक भाषेत स्ट्रीट प्ले, मी अवयवदानाला पाठिंबा देतो बिल्ला दिवस, पोलिस स्टेशन व इतर शासकीय कार्यालयात जनजागृती रॅली तर शेवटच्या दिवशी पालकमंत्र्यांच्या हस्ते अवयवदात्यांच्या नातेवाईकांचा सत्कार होणार आहे.

# कळवा येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : खर्डीकर क्लासेस, स्पंदन संस्था, सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय व इतर शासकीय विभागाच्या संयुक्त विद्यमाने कळवा येथील पारसिक नगर परिसर ज्येष्ठ नागरिक संस्थेत मोफत आरोग्य तपासणी शिबिर व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिकांना वाढत्या वयानुसार जाणवणाऱ्या दुखण्यावर रामबाण ईलाज करता यावा या उद्देशाने हे शिबीर राबविले असल्याचे खर्डीकर क्लासेस चे संस्थापक अध्यक्ष डॉ.सुनील खर्डीकर यांनी सांगितले.

आयोजित शिबिरात डॉ. माधुरी कुलकर्णी यांनी उपस्थित नागरिकांवर नैसर्गिकरित्या उपचार केले. सतत जाणवणारी पोटदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी अशा शारीरिक दुखण्यांवर एक्युप्रेशर, एकयुपंक्चर व सांगीतिक पद्धतीने उपचार करण्यात आले. आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन पटू करिष्मा खर्डीकर हिने देखील उपस्थित रुग्णांवर या थेरपीने यशस्वीपणे उपचार केले. आयोजित शिबिराचा शेकडो ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घेत डॉक्टरांच्या टीमसह संपूर्ण खर्डीकर क्लासेसचे आभार व्यक्त केले.

# सुभेदारवाडा प्राथमिक शाळेत मंगळागौर उत्सव संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : दि.०५.०८.२०२५ वार मंगळवार रोजी ज.ए.इ.ची सी.एम. पुराणिक प्राथमिक शाळा सुभेदारवाडा कल्याण (प) येथे पारंपरिक उत्साहात श्रावण मासातील मंगळागौरीचा सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. या उपक्रमात विद्यार्थिनी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या शैलजा मोडक व कार्यक्रमाचे अध्यक्ष रंजना पाटील व शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पोतदार तसेच पालक शिक्षक संघाच्या उपकार्यवाह व उपाध्यक्ष आणि सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत मुलींनी कार्यक्रमात पारंपारिक वेशभूषा करून गाणी, उखाणे, खेळ, नृत्य व फेर धरून सांस्कृतिक वारसा जपला.

या कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे शिक्षकवृंदांनी परिश्रमपूर्वक केले. सर्वांनी एकत्र येऊन साजरा केलेला हा मंगळगौरीचा कार्यक्रम शाळेच्या सांस्कृतिक वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण क्षण ठरला.

# आर्मी मॅन प्रदीप सदगीर यांचा शहापुरात सत्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी : भारतीय लष्कर सेवेत धाडसी आणि अत्यंत जोखमीच्या समजल्या जाणाऱ्या 1841 रॉकेट रेजिमेंट मध्ये सेवा देणारे प्रदिप सोमनाथ सदगीर हे आपल्या 17 वर्षाच्या प्रदीर्घ देशसेवे नंतर सेवानिवृत्त झाले. या शुरवीराचे शरद पवार गट राष्ट्रवादीचे जिल्हा समनव्यक व माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष शिंदे,उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शहरप्रमुख विजय देशमुख, शरद पवार राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष नंदकुमार मोगरे यांनी त्यांच्या घरी जाऊन त्यांना पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार केला.यावेळी प्रदीप सदगीर यांनी गेल्या 17 वर्षीच्या कारकिर्दीत केलेल्या देशसेवेचे अनुभव यावेळी सांगितले. राजाभाऊ डोंगरे, राम भोईर, कैलास निचिते, सुनिल धलपे,शांताराम फर्डे,कौस्तुभ लिमये, प्रसाद साळवी, लखन बेनके,राहुल मोगरे, अरविंद गावंडे यांच्यासह तालुक्यातील अनेक मान्यवर व पदाधिकारी उपस्थित होते.

# कोविड काळात निधन झालेल्या व्यक्तीच्या वारसाला जिल्हा प्रशासनाची मदत

### देशातील मुलांमधून पहिले लाभार्थी असून महाराष्ट्र राज्यातील पहिलेच लाभार्थी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कोवीड - 19 या साथीच्या रोगाने ज्या बालकांचे आई वडीलांचे निधन झाले आहे. अशा बालकांसाठी PM CARE FOR Children या योजने अंतर्गत महिला व बाल विकास विकास विभाग, भारत सरकार यांच्याकडून अर्थ सहाय्य मंजूर करण्यात येत आहे.

कोवीड - 19 या साथीच्या रोगाने श्री. अमनजीत सिंह यांच्या आई वडीलांचे निधन झाले होते व त्यांना महिला व बाल विकास विकास विभाग, भारत सरकार यांच्या मार्फत अर्थ सहाय्य मंजूर करण्यात आले होते व अर्थ सहाय्याची रक्कम मुदतठेव म्हणून पोस्ट खात्यात ठेवण्यात आली होती.

श्री. अमनजीत सिंह यांची पोस्ट खात्यामध्ये ठेवलेल्या अर्थ सहाय्य रकमेची मॅच्युरिटी दि.4 ऑगस्ट 2025 रोजी पूर्ण झालेली असून जिल्हाधिकारी, ठाणे श्रीकृष्णनाथ पांचाळ, (भा.प्र.से.) यांच्याहस्ते दि. 4 ऑगस्ट 2025 रोजी दुपारी 4.00 वा. त्यांना रु. 10 लाख चा धनादेश देण्यात आलेला आहे.

श्री. अमनजीत सिंह हे देशातील मुलांमधून पहिले लाभार्थी असून महाराष्ट्र राज्यातील पहिलेच लाभार्थी आहेत. ज्यांना वयाची 23 वर्ष पूर्ण होवून अर्थ सहाय्याची रक्कम धनादेशाव्दारे रक्कम अदा करण्यात आली आहे.या कार्यक्रमास ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ, (भा.प्र.से.), भारतीय पोस्ट विभाग, वरिष्ठ अधीक्षक के. नरेंद्र बाबू, ठाणे,जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता विजय शिंदे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, ठाणे, रामकृष्ण रेड्डी, जिल्हा बाल संरक्षण कक्ष ठाणे संरक्षण अधिकारी (संस्थात्मक) पल्लवी जाधव, पोस्ट मास्टर राजीव हॉलीगोल, उप पोस्ट मास्टर सी. बी. बडगे, जनसंपर्क अधिकारी आर. एस. बोमबडे, जि. या. सं. कक्ष, ठाणे माहिती विश्लेषक उमेश आहरे, जिल्हा बाल संरक्षण कक्ष ठाणे बहुउद्देशीय कार्यकर्ता कृष्णा मोरे हे अधिकारी उपस्थित होते, असे ठाणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नमिता शिंदे यांनी कळविले आहे.

## आरोग्य

### या सवयी व्हेरिकोस व्हेन्सचा त्रास वाढवतात

व्हेरिकोज व्हेन्स ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये शिरा सुजतात आणि वळतात, विशेषतः पाय आणि पायांच्या खालच्या भागात. या शिरा त्वचेखाली फुगलेल्या आणि वळलेल्या दिसू शकतात आणि बहुतेकदा वेदना, अस्वस्थता किंवा थकवा सोबत असतो.

**फार काळ बसणं**

एकाच ठिकाणी उभं राहणं त्रासदायक आहे त्याचप्रमाणे एकाच जागेवर बसून राहणंदेखील आरोग्याला नुकसानकारकच ठरते. डेस्क जॉब असणाऱ्यांना हा त्रास अधिक जाणवतो. फार काळ बसून राहिल्याने लठ्ठपणा वाढण्यासोबतच व्हेरिकोज व्हेन्सचा त्रासही वाढतो. त्यामुळे ठराविक वेळाने उठून थोड्यावेळ फिरा.

**फार काळ उभं राहणं**

काही लोकांना नोकरी करताना त्याचा एक भाग म्हणून सतत उभं राहव लागतं. एकाच जागी फार काळ उभं राहिल्यास व्हेरिकोस व्हेन्सचा त्रास वाढतो. एकाच जागी उभं राहण्यापेक्षा थोडं चाला, फिरा. अन्यथा पायांवर ताण येतो. रक्त साखळण्याचा धोका वाढतो. हळूहळू रक्तवाहिन्यांमधील व्हॉल्वला देखील नुकसान होते.

**मिठाचा वापर जास्त**

वेफर्स, लोणचं, पापड यामध्ये मीठ अधिक असते पण त्याचा आहारात अधिक प्रमाणात समावेश केल्यास व्हेरिकोस व्हेन्सचा त्रास वाढू शकतो. मिठामुळे शरीरात पाणी साचून राहते आणि त्याचा ताण रक्तवाहिन्यांवर येतो.

**पाय क्रॉस करून बसणं**

पायांवर पाय ठेवून बसण्याच्या सवयीमुळे पायांवर आणि हिप्सवरही ताण येतो. यामुळे रक्तवाहिन्या फुगतात. हळूहळू जाळं वाढतं.

## आजचे राशि भविष्य



**मेष**

ऑफिसमध्ये एखाद्या प्रोजेक्टचे नेतृत्व तुम्हाला करावे लागेल किंवा व्यवसायात महत्त्वाची डिल होण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल.

**वृषभ**

दुर्लक्ष करा. गर्व केल्यामुळे काहीही साध्य होत नाही. घरात तुमचे वजन वाढेल आणि घरातील अनेक कामे तुम्ही मार्गी लावाल.

**मिथुन**

.प्रेमसंबंधात नाते अधिक मधुर होईल, एकमेकांना जास्त वेळ देण्याचा प्रयत्न करा. विचारांनी लोकांचं लक्ष वेधून घेणार आहात.उत्तम यश मिळेल.

**कर्क**

व्यावहारिक काम आणि कागदपत्रांशी संबंधित मुद्दे समोर येतील, तुम्ही घाबरु नका. व्यवस्थित समजून घ्या आणि मार्गक्रमण करा.

**सिंह**

कामात फोकस ठेवा तसेच कागदपत्रे व्यवस्थित तापसून पाहा.आज असे काही निर्णय घ्यावा लागू शकतो जो इतरांसाठीही महत्त्वाचे असतील.

**कन्या**

तुम्ही खूप जास्त भावनिक होणार आहात. एखाद्या जवळच्या व्यक्तीसोबत मनातलं बोलण्याची संधी मिळेल, ज्यामुळे नातेसंबध अधिक दृढ होतील .

**तूळ**

तुमचे मत किंवा विचार तुम्ही चांगल्या प्रकारे इतरांना समजावून सांगणार आहात. मित्रांशी किंवा सहकाऱ्यांशी मोकळ्या मनाने संवाद साधा.

**वृश्चिक**

कामे संथ गतीने होतील. वातावरण ठिक असेल. नोकरी किंवा व्यवसायात काही अडचणी येवू शकतात.बदलाचा सामना करावा लागू शकतो.

**धनु**

तुमची उपस्थिती तसेच तुमचे मत गांभीर्याने घेतले जाईल. ही वेळ आत्मविश्वासाने पुढे जाण्याची आहे. तुमच्यात अहंकार वाढू शकतो त्याकडे

**मकर**

काही कामांमध्ये संभ्रम किंवा निर्णय घेण्याची अडचण होवू शकत अशावेळी तुमचे मन काय सांगते ते ऐका तुम्हाला नक्की मार्ग सापडेल

**कुंभ**

तुमचा मानसिक ताण कमी होईल. एखादा जुना प्रोजेक्ट पुन्हा तुमच्याकडे येवू शकतो त्याचा स्विकार करा.उद्दिष्टांवर ठाम राहावं लागेल.

**मीन**

बदल सकारात्मक आहेत त्याचा स्विकार करा. काही नवीन लोकांना भेटण्याचा विचार करू शकता. नवीन संधी मिळाली तर त्याचा लाभ घ्या.






# डॉक्टर अभावी 'सोनोग्राफी' यंत्रणा बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई:** सवलतीच्या दरात रुग्णांना सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी महापालिकेच्या रुग्णालयात सोनोग्राफी यंत्रणा बसविली आहे. मात्र ही यंत्रणा हाताळणी करण्यासाठी मागील काही वर्षांपासून कायमस्वरूपी डॉक्टरच उपलब्ध होत नसल्याने ही सातत्याने ही यंत्रणा बंदच असल्याचे चित्र दिसून येत आहे. या आर्थिक भुर्दंड मात्र सर्वसामान्य रुग्णांना सहन करावा लागत आहे.

वसई विरार शहरात महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सेवा दिली जात आहे. या आरोग्य सेवेसाठी सद्यस्थितीत शहरात पालिकेची २ माताबाल संगोपनकेंद्र, ७ रुग्णालये, २१ प्राथमिक आरोग्य केंद्र, १५ आपला दवाखाना, ३५ आयुष्यमान आरोग्य वर्धिनी केंद्र आहेत. त्याद्वारे नागरिकांना मोफत आरोग्य सेवा पुरविली जाते. पालिकेच्या रुग्णालयात मोफत सेवा मिळत असल्याने मोठ्या संख्येने रुग्ण हे पालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी येत असतात.

महापालिकेने गर्भवती महिला व अन्य रुग्ण यांच्या सोनोग्राफीसाठी सर डी एम पेटिट, जूचंद्र रुग्णालय, तुळींज रुग्णालय अशा तीन ठिकाणी सोनोग्राफी यंत्रणा बसविल्या आहेत. सुरवातीला विशेषतः गर्भवती महिलांच्या प्रसूती पूर्व सोनोग्राफी करण्यात येत होत्या.

त्यानंतर ही यंत्रणा हातळण्यासाठी कायमस्वरूपी डॉक्टरच उपलब्ध होत नसल्याने सातत्याने यंत्रणा बंदच राहू लागल्या आहे. सोनोग्राफी यंत्रणा बंद असल्याने गर्भवती महिला यासह अन्य रुग्णांना खासगी सोनोग्राफी केंद्रात जावे लागत आहे. जिथे सवलतीच्या दरात काम होते तिथे आता हजारो रुपये खर्च करावे लागत आहेत. यामुळे गोर गरीब नागरिकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे.

# अलिबाग नगर परिषदेच्या हद्द वाढीसाठी चर्चांना उधाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अलिबाग, ता. ५ (वार्ताहर)** जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या अलिबाग नगरपालिकेच्या हद्दीलगतच्या चेंढरे, वरसोली, वेश्वी आणि कुरूळ, आक्षी या ग्रामपंचतींचा समावेश करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. तर विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांच्या तोंडी आदेशानुसार अलिबाग नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासन अधिकारी सचिन बच्छाव यांनी हद्दवाढीबाबत ग्रामपंचायतींकडून हरकती मागवल्या आहेत. या ग्रामपंचायतींपैकी तीन ग्रामपंचायतींनी अनुकूलता दर्शविली असून, कुरूळ ग्रामपंचायत अजूनही अनुकूल नसल्याचे मुख्याधिकारी तथा प्रशासन अधिकारी सचिन बच्छाव यांनी सांगितले आहे.




सध्या अलिबाग नगर परिषदेचा कारभार मुख्याधिकारी तथा प्रशासक म्हणून सचिन बच्छाव यांच्या देखरेखेखाली सुरू आहे. अलिबाग नगर परिषद हद्दीतील लोकसंख्या पाहता ती दिवसेंदिवस वाढतच आहे. दरम्यान,

नगरपालिकेच्या हद्दीलगतच्या चेंढरे, वरसोली, वेश्वी आणि कुरूळ, आक्षी या ग्रामपंचतींचा समावेश करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र या निर्णयाला चारपैकी एका म्हणजे कुरूळ ग्रामपंचायतीने विरोध दर्शविला आहे. त्यामुळे आगामी काळात या ग्रामपंचायतीबाबत काय निर्णय होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. सद्य:स्थितीत वेश्वी ग्रामपंचायत वगळता सर्वच ग्रामपंचायतींचा कारभार प्रशासकाच्या माध्यमातून सुरू आहे. अलिबाग नगरपालिकेची सध्याची हद्द जेमतेम ६ किमी इतकीच आहे. लगतच्या ग्रामपंचायतींना सहभाग करून घेतल्यानंतर ही हद्द २५ किमीपर्यंत वाढणार आहे. सध्या शहरातील पाणीप्रश्नासह वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या अपूर्ण रस्त्यांच्या कामाचा फटका अलिबागकरांना बसत आहे. अगदी छोट्याशा जागेत अलिबाग शहर वसले असल्याने त्यास बकालपणा येत आहे. शहरात ठिकठिकाणी कचऱ्याच्या ढिगाऱ्याबाबतही अलिबागकर त्रस्त झाले आहेत. शहरात विविध ठिकाणी सध्या नवीन बांधकामे सुरू आहेत. हे प्रश्न सोडविण्यास नगर परिषद प्रशासन अपयशी ठरत आहे. त्यामुळे अतिरिक्त लोकसंख्येचा भार उचलण्यासाठी नगर परिषद प्रशासन सज्ज आहे का, याबाबत प्रथम विचार करून मगच निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

# वाढणाऱ्या मतदार संख्येमुळे पालघर जिल्ह्यात राजकीय नेते आणि मतदारांमध्ये संभ्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर :** पालघर लोकसभेअंतर्गत असणाऱ्या सहा विधानसभा क्षेत्राची लोकसंख्या २३.९६ लाखांच्या पुढे गेली असून विधानसभा निवडणुकीनंतर १.०४ लक्ष मतदार वाढले आहेत. मतदार वाढण्याची गती कायम असून विधानसभा निवडणुकीनंतर नालासोपारा व बोईसर विधानसभा क्षेत्रांमध्ये वाढणाऱ्या मतदार संख्या अनुक्रमे ४८ हजार व २६ हजारने वाढली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी शासनातर्फे कोणती मतदार यादी गृहीत धरली जाईल याविषयी राजकीय पक्षांच्या नेते मंडळींमध्ये संभ्रम असून वाढणारी मतदार संख्या सर्वच राजकीय पक्षांसाठी चिंतेची बाब ठरली आहे. राष्ट्रीय निवडणूक आयोगातर्फे १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै व १ ऑक्टोबर या चार दिवशी मतदार संख्येचे अंतरीम निश्चितीकरण करण्यात येते. विधानसभा निवडणूक २०२४ च्या प्रसंगी पालघर लोकसभा क्षेत्रात २२.९२ लक्ष मतदार नोंदवले गेले होते. २२ मे व २६ मे २०२५ रोजी पालघर लोकसभा क्षेत्रातील मतदारसंघ अनुक्रमे २३.७९ लक्ष व २२.८४ लक्ष इतकी होती. १ जुलै रोजी मतदार संख्या अंतिमकरण करून संख्या निश्चित करण्यात आली नसून १ ऑगस्ट रोजी पालघरची मतदार संख्या २३.९६ लक्ष पर्यंत पोहोचली आहे. मतदार संख्या निश्चितीकरण प्रक्रिया मे महिन्याच्या व्यतिरिक्त जानेवारी व जुलै २०२५ मध्ये झाली नसल्याने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कोणती मतदार संख्या व यादी ग्राह्य धरली जाईल याबाबत वेगवेगळे मतप्रवाह पुढे येत आहेत.

# पोलीस अधिकारी संभाजी देशमुख यांना दुसऱ्यांदा राष्ट्रपती पोलीस पदक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** पोलीस दलात केलेल्या उल्लेखनीय कामगीरीमुळे राज्य गुप्त वार्ता विभागातील पोलीस अधिकारी संभाजी देशमुख यांना सलग दुसऱ्यांदा राष्ट्रपती पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले आहे. राजभवन येथे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या सोहळ्यात संभाजी देशमुख यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे.



यापूर्वीही संभाजी देशमुख यांना २०१६ मध्येही जाहीर झालेले राष्ट्रपती पदक राज्यपाल विद्यासागर राव यांच्या हस्ते सन २०१८ ला देण्यात आले होते. २८ जुलै रोजी पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

सध्या राज्य गुप्त वार्ता विभागात कार्यरत असलेल्या संभाजी नारायण देशमूख यांनी पोलीस दलामध्ये ठाणे शहर आयुक्तालय, अँन्टीकरप्शन विभाग, राज्य गुप्तवार्ता विभाग मुंबई - कल्याण या प्रमुख ठिकाणी रश्मी शूक्ला, आशूतोष डूंबरे, श्रीकांत सावरकर, फत्तेसिह पाटील, छेरींग दोरजे, किशोर जाधव, दिपक साकोरे, संदिप जाधव, पराग मणेरे आदी वरिष्ठ अधिका-यांच्या मार्गदर्शनामध्ये उत्कृष्ट सेवा बजावलेली आहे. दुसऱ्यांदा मिळालेल्या मानाच्या राष्ट्रपती पोलीस पदकाबद्दल संभाजी देशमुख यांच्यावर पोलीस अधिकारी, शहरातील अनेक मान्यवर व्यक्तींकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# भिवंडीत मेट्रोचा निष्काळजीपणा
## प्रवाशाच्या प्रवाशाच्या डोक्यात शिरला लोखंडी रॉड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी येथे मेट्रो कामा दरम्यान कंत्राटदाराकडून निष्काळजी होत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मंगळवारी मेट्रो कामावेळी रिक्षातून प्रवास करणाऱ्या एका तरुणाच्या डोक्यात लोखंडी रॉड शिरुन तो जखमी झाला आहे. तरुणावर भिवंडी येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरु असून त्याची प्रकृती गंभीर झाली. दरम्यान, तरुणाच्या उपचाराचा सर्व खर्च केला जात असून कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई केल्याची माहिती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) दिली.



भिवंडी येथे ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो पाच प्रकल्पाच्या निर्माणाचे काम सुरू आहे. येथील धामणकर नाका परिसरात मेट्रो स्थानक उभारले जात आहे. दरम्यान, येथील स्थानकाखाली शेअर रिक्षाने तरुण प्रवास करत होता. त्याचवेळी धामणकर नाका मेट्रो स्थानकाचे काम सुरु असताना तेथील लोखंडी रॉड रिक्षात बसलेल्या तरुणाच्या डोक्यात शिरला. या घटनेनंतर तरुणाला स्थानिकांनी तात्काळ एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. त्याच्या डोक्यात दोन ते तीन इंच रॉड आत गेल्याचेही डॉक्टर म्हणाले. दरम्यान, या घटनेनंतर मेट्रो मार्गिका निर्माणाच्या कामाविषयी नागरिकांकडून प्रश्न विचारले जात आहेत.

### कंत्राटदारावर ५० लाखांचा दंड

एमएमआरडीएने स्पष्ट केले की, बांधकामासाठी जबाबदार असलेल्या मेसर्स अफकॉन्स, सिव्हिल कॉन्ट्रॅक्टरवर ५० लाखांचा दंड आकारण्यात आला आहे. मेट्रो मार्गिका पाचचे जनरल कन्सल्टंट मेसर्स सिस्ट्रा-सीईजी-सिस्ट्रा (इंडिया) यांना पर्यवेक्षी त्रुटींसाठी पाच लाख रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. या प्रकरणाची तटस्थ आणि तज्ञ चौकशी करण्यासाठी एआयसीएचे मुख्य सुरक्षा व्यवस्थापक, मेट्रो मार्गिका 'दोन ब'चे जनरल कन्सल्टंट यांच्या अंतर्गत एक स्वतंत्र चौकशी स्थापन करण्यात आली आहे. चौकशीच्या निष्कर्षांवर आधारित पुढील कारवाई केली जाईल. एमएमआरडीए सर्व जबाबदारीचे उपाय लागू करेल आणि प्रणालीगत सुरक्षा सुधारणा त्वरित अंमलात आणल्या जातील याची खात्री करेल असेही एमएमआरडीएकडून स्पष्ट करण्यात आले.

# अपघातमुक्त गणेशोत्सव साजरा करूया
## पनवेल पालिका आयुक्तांचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल** - राज्य सरकारने गणेशोत्सवाला राज्य उत्सव असा दर्जा दिला असला तरी शहरातील अनेक रस्त्यांवर पडलेल्या खड्यांमधून गणरायाच्या मूर्ती आगमन कसे करावे, पनवेलमधील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी काही तरी करा, झाडांच्या फांद्यामुळे मूर्ती मिरवणूकांना त्रास होतो. सिडकोकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळवणे सर्वात कठीण प्रश्न, विसर्जन रस्त्यावर लोंबकळणा-या विजवाहिन्यांमुळे अपघात होऊ शकतो अशा विविध समस्या व प्रश्नांचा भडिमार पनवेल महापालिकेने मंगळवारी आयोजित केलेल्या गणेशोत्सवाच्या आढावा बैठकीत गणेशोत्सव मंडळांच्या प्रतिनिधींनी केल्या. यावर महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी निवेदन करताना यंदाचा गणेशोत्सव अपघात मुक्त साजरा करण्याचा संकल्प करूया असे आवाहन मंडळांच्या प्रतिनिधींना केले. पनवेल महापालिका क्षेत्रातील गणेशोत्सवामधील वाहतूकीची समस्येचे निवारण करण्यासाठी पोलीस दलाला शंभर वार्डन देण्याची तयारी पालिकेने या बैठकीत दर्शविली. सर्वात महत्वाचे म्हणजे न्यायालयाच्या निर्देशामुळे सहा फुटांच्या खालील सर्व गणेश मूर्ती कृत्रिम तलावांमध्ये विसर्जित कराव्या लागतील, अशी महापालिकेची भूमिका या बैठकीत आयुक्त चितळे यांनी स्पष्ट केली. गणेशोत्सवाला २२ दिवस शिल्लक असताना पनवेल महापालिका क्षेत्रातील विविध गणेशोत्सव मंडळांच्या अडचणी एकुण घेण्यासाठी आणि महापालिकेची गणेशोत्सवासाठी आखलेली भूमिका स्पष्ट करण्यासाठी ही बैठक महापालिकेने आयोजित केली होती. या बैठकीमध्ये पालिका आयुक्त चितळे, सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब ढोले, पालिकेचे उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, स्वरूप खारगे तसेच शहर अभियंता संजय कटेकर यांच्यासह वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, राजेंद्र कोते, अजय कांबळे, अजय भोसले, संजय पाटील, दिलीप चव्हाण, विमल बिडवे, स्मिता ढाकणे व इतर सरकारी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# म्हाडा कोकण वसाहत पुर्नविकास प्रकल्प पूर्ण करणारच
## विकासकांचा पत्रकार परिषदेत दावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बहुचर्चित म्हाडा कोकण वसाहत पुर्नविकास प्रकल्प टायकून ग्रुप पूर्ण करणारच असल्याचा दावा टायकून ग्रुपचे श्रीकांत शितोळे यांनी केला आहे. पुर्नविकासप्रकल्पातील बाधित नागरिकांच्या वतीने करण्यात आलेल्या आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.




श्रीकांत शितोळे यंनी सांगितले की, प्रकल्प पूर्ण करण्यास उशिर झाला हे मान्य आहे. काही धोरणात्मक त्रूटीमुळे प्रकल्प पूर्ण करण्यात अडचणी निर्माण झाल्या. या सगळया तांत्रिक बाबी पूर्ण झालेल्या आहेत. सर्व मंजूरीसह वित्तीय मंजूरीही प्राप्त झाली आहे. घरभाड्यापोटी सुमारे 112 कोटी रू देण्यात आले असून, आज देखील 90 टक्के सभासद आमच्या पाठीशी आहेत. अडचणींवर मात करीत एक नामकिंत ब्रांड म्हणून आमचा नावलौकीक असून शासन स्तरावर आवश्यक ती मदत होत आहे. आम्ही पुर्नविकास बाधितांना त्यांची घरे देणार आहोत, त्यामुळे उपोषणकर्त्यांनी त्यांचे गैरसमज दूर करावेत. प्रकल्पात त्यांनी सामिल व्हावे, या प्रकल्पाला ९० टक्के सभासदांचा पाठिंबा आहे. या प्रकल्पात १२ संस्था आहे. त्यापैकी ११ संस्था प्रकल्पाच्या पाठिंबा आहे. ही महत्वाची गोष्ट आहे ती समजून घेऊन उर्वरित सदस्यांनी देखील प्रकल्पाला पाठिंबा देण्याचे आवाहन श्रीकांत शितोळे यांनी केले.




# रविवारी गोर बंजारा समाजाचा तीज महोत्सव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गोर बंजारा समाजाचा पारंपारिक तीज महोत्सव व कौटुंबिक स्नेह मेळावा शुक्रवार दि.१ ऑगस्ट ते रविवार १० ऑगस्ट पर्यंत आयोजित केले आहे. शनिवार दि. ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ४ वा. राधाकृष्ण मंदिर, नांदिवली अध्यक्ष ईश्वर राठोड यांच्या घरी, कृष्णामाई पार्क येथे ढबोळीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी १० ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते ४ यावेळेत कल्याण पूर्वेतील नांदिवली येथे चंद्रभागा मॅरेज हॉल याठिकाणी कौटुंबिक स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला आहे. तर संध्याकाळी ५ वाजता कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी किल्ला गणेश घाट याठिकाणी तीज विसर्जन करण्यात येणार आहे. सर्व समाज बांधवांनी बंजारा संस्कृतीचा प्रचार प्रसार व संवर्धन करण्यासाठी पारंपारिक वेशभूषा मध्ये परिवारासह उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजक गोर बंजारा समाज बांधव नांदिवली यांनी केले आहे.

# ठाणे महापालिकेकडून गणेश विसर्जन व्यवस्थेत वाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सहा फुटांपर्यंतच्या सर्व गणेश मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावात करण्यात येणार आहे. तर, सहा फुटांपेक्षा जास्त उंचीच्या मूर्ती नैसर्गिक जलस्रोतात विसर्जित करता येणार आहेत. त्यामुळे कृत्रिम तलाव व फिरत्या विसर्जन व्यवस्थेत वाढ करण्यात आली आले. गेल्यावर्षीपेक्षा दीड पटीने जास्तीची विसर्जन व्यवस्था ठाणे महापालिकेतर्फे करण्यात येत असल्याची माहिती महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली आहे.

राज्य उत्सवाचा दर्जा मिळालेला गणेशोत्सव यंदाही दरवर्षीच्याच उत्साहाने साजरा करूया. नागरिकांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेऊन गणपती बाप्पाच्या आशिवार्दाने उत्सव निर्विघ्नपणे साजरा करूया, असे आवाहनही आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्यावतीने मंगळवारी महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२५ आयोजनासाठी बैठकीचे आयोजन केले होते. महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला गणेशोत्सव मंडळांचे प्रतिनिधी, विक्रेते, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, पोलिस उपायुक्त प्रशांत कदम, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, महापालिका उपायुक्त मनीष जोशी, शंकर पाटोळे, मधुकर बोडके, दिनेश तायडे, सचिन सांगळे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांच्यासह महापालिका, महावितरण, टोरंट पॉवर, स्वंयसेवी संस्था यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



**•कृत्रिम तलावात मूर्ती विसर्जनाला प्राधान्य असल्याने**
**•ठाणे महापालिकेने केली विसर्जन व्यवस्थेत वाढ**

### अतिरिक्त विसर्जन व्यवस्था

मा. उच्च न्यायालयाचे आदेश आणि कृत्रिम तलावांकडे वाढणारा ओढा लक्षात घेऊन महापालिकेने यावर्षी अतिरिक्त विसर्जन व्यवस्था केली आहे. प्रभाग समितीनिहाय आणि पोलीस स्थानक निहाय होणाऱ्या गणेशोत्सव मंडळांच्या बैठकांमध्ये आणखी सूचना आल्यास त्याचाही समावेश विसर्जन व्यवस्थेत केला जाईल, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. गणेशभक्तांचा उत्साह वाढत असून त्याचबरोबरीने पर्यावरणविषयक जागरुकताही वाढत आहे. गेल्यावर्षी केलेल्या फिरत्या हौद विसर्जन व्यवस्थेचे नागरिकांनी स्वागत केले. त्यामुळे यावर्षी त्यात वाढ करून पथकांची संख्या १५ करण्यात आली आहे, असेही आयुक्त राव यांनी सांगितले.

यावर्षी २४ कृत्रिम तलाव, ७४ टाकी विसर्जन व्यवस्था, १५ फिरत्या विसर्जन व्यवस्था, ०९ घाट विसर्जन व्यवस्था आणि १० मूर्ती स्वीकृती केंद्र अशा एकूण १३२ ठिकाणी विसर्जन व्यवस्था करण्यात येणार आहे. गतवर्षी एकूण ८८ विसर्जन व्यवस्था होत्या.

### दोन सत्रात स्वतंत्र मनुष्यबळ

विसर्जनाच्या ठिकाणी मनुष्यबळ वाढवण्याची मागणी करण्यात आली होती. ती लक्षात घेऊन मनुष्यबळ वाढवण्यात येईल. तसेच, दोन सत्रात मनुष्यबळाची व्यवस्था करण्यात येईल. त्यामुळे कार्यक्षमतेत सुधारणा होईल, असा विश्वास आयुक्त राव यांनी व्यक्त केला. घाट विसर्जनस्थळी क्रेन आणि वाढीव बार्ज असावेत, अशी सूचना गणेशोत्सव समन्वय समिती आणि पोलिसांनी केली आहे. त्याबाबत विचार करण्याचे आश्वासनही आयुक्त राव यांनी दिले.

### समन्वय अधिकारी

गणेशोत्सव मंडळ, पोलीस यांना महापालिकेकडून काही व्यवस्था हवी असल्यास किंवा व्यवस्थेत काही त्रुटी असल्याच त्याचे निराकरण करण्यासाठी व्हॉट्सअप ग्रुप तयार करण्यात येत आहे. उपायुक्त (अतिक्रमण) शंकर पाटोळे हे महापालिकेकडून त्यासंदर्भातील समन्वय अधिकारी म्हणून काम पाहतील, असेही आयुक्त राव यांनी या बैठकीत सांगितले. स्थानिक पोलिस, मंडळाचे पदाधिकारी आणि महापालिका अधिकारी यांनी आपापल्या भागातील विसर्जन व्यवस्थेची संयुक्त पाहणी करावी. त्यात लक्षात येणाऱ्या बाबींची नोंद घेऊन स्थानिक सहाय्यक आयुक्तांनी कार्यवाही करावी, असे निर्देशही आयुक्त राव यांनी दिले.

### विसर्जन व्यवस्थेचे विकेंद्रीकरण

एकाच ठिकाणी विसर्जनासाठी गर्दी होऊ नये म्हणून महापालिकेने जास्तीचे कृत्रिम तलाव नियोजित केले आहेत. तसेच, मंडळांनी नवरात्रौत्सवाच्या काळात होणाऱ्या गैरसोयीचा मुद्दा मांडला असून त्याबाबत महापालिका प्रशासन दक्ष राहील, असे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी स्पष्ट केले.

प्रशासन आणि गणशोत्सव मंडळ यांनी एकत्रितपणे समन्वयाने सण साजरा करू. कार्यकर्तेच प्रशासनाचे कान, नाक, डोळे आहेत. स्थानिक पोलीस स्टेशन जेव्हा मंडळांच्या बैठका घेतील तेव्हा सर्व यंत्रणांचे स्थानिक अधिकारीही तेथे उपस्थित राहतील, असे पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांनी स्पष्ट केले.

बैठकीच्या प्रारंभी, पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाचे आदेश, त्याअनुषंगाने राज्य शासनाने जाहीर केलेली कार्यपद्धती याची सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली. तसेच, ठाणे महापालिकेने संपूर्ण विसर्जन व्यवस्थेची माहिती देणारे हरित विसर्जन ॲप तयार केले आहे. ते लवकरच नागरिकांसाठी सर्व मोबाईल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होणार असल्याचेही प्रधान यांनी सांगितले.

बैठकीत, मंडळांच्या वतीने विसर्जन व्यवस्थेबाबत ठाणे जिल्हा गणेशोत्सव समन्वय समितीचे उपाध्यक्ष रवींद्र पालवे, उल्हास बर्डे, विनायक सुर्वे, वासुदेव अलगुज, विकी चंको, विशाल महाडिक आदींनी विविध मुद्दे मांडले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाचे नवी मुंबई मनपात रक्षाबंधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर प्रति वर्षी प्रमाणे प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात रक्षाबंधन उपक्रम साजरा करण्यात आला. याप्रसंगी विश्वविद्यालयाच्या नवी मुंबई प्रमुख श्रीम. शिलादीदी व त्यांच्या सहका-यांनी महानगरपालिका अधिकारी, कर्मचारीवृंदास राखी बांधून शुभेच्छा दिल्या. राखी हा भारतीय संस्कृतीतील एक महत्वाचा सण असून माणसा माणसा मधील नाते घट्ट करणारा उत्सव आहे अशा शब्दात रक्षाबंधन उत्सवाचे महत्व सांगत प्रजापिता ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या श्रीम. शिलादीदी यांनी प्रबोधन केले. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक ताणतणाव वाढला असून तो कमी करण्यासाठी अंतर्मुख होऊन स्वत:शी संवाद केला पाहिजे असे सांगत त्यांनी सहनशीलता आणि सामावून घेण्याची शक्ती हे दोन गुण तणावमुक्तीसाठी महत्वाचे असल्याचे सांगितले. दैनंदिन व्यवहारात योगसाधनेची गरज असल्याचेही त्या म्हणाल्या.

याप्रसंगी घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या उपआयुक्त श्रीम. स्मिता काळे, महापालिका सचिव श्रीम. चित्रा बाविस्कर, सहा.आरोग्य अधिकारी डॉ. रत्नप्रभा चव्हाण, सहा.आयुक्त श्रीम. स्वरुपा परळीकर व श्रीम. शिल्पा देशपांडे, प्रशासकीय अधिकारी श्री. रवी जाधव आणि इतर अधिकारी, कर्मचारी यांना राखी बांधण्यात आल्या. विशेष म्हणजे महिला कर्मचा-यांनाही राखी बांधण्यात आल्या.

# महसूल सप्ताहानिमित्त शहापुरात फेरफार अदालत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर येथील उप अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात महसूल सप्ताहानिमित्त ७ ऑगस्ट रोजी रोजी विशेष फेरफार अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार जनतेची कामे गतिशील व अचूक कामे होणे कामी विशेष उपाययोजना करणेबाबत शासनाच्या उदिष्ठानुसार भूमी अभिलेख कार्यालयात ७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ३ वाजेपर्यंत १) प्रलंबित फेरफार प्रकरणे २) फेरफारबाबत असलेल्या अडचणी ३) आदिवासी बांधवाना जमीन मोजणी कामी व अभिलेख कामी असलेल्या अडचणी चे मार्गदर्शन व सोडवणूक कामकाज करणे.

या सर्व कामासाठी विशेष नियोजन केलेले आहे. या कामकाज समाधान शिबिरात प्रलंबित काम असलेले सर्व आदिवासी बांधव व फेरफाराशी निगडीत असलेली सर्व जनता यांनी विशेष कामकाजाचा लाभ घ्यावा. या विशेष शिबीराचे आयोजन जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील यांचे मार्गदर्शन लाभल्याचे उप अधीक्षक शरद काळे भूमी अभिलेख, शहापूर यांनी दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात म्हटले आहे.

# सहजानंद चौकातील वाहतूक बदल तातडीने रद्द करा; अन्यथा आंदोलन

## - माजी सभागृह नेते श्रेयस समेळ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याण पश्चिमेतील सहजानंद चौकात होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलिसांनी काही दिवसांपासून वाहतुकीच्या मार्गात बदल केले आहेत. मात्र वाहतूक कोंडी फोडण्यासाठी केलेले हे वाहतूक बदल म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर असल्याचे सांगत ते तातडीने रद्द करावे अन्यथा आम्ही शिवसेना स्टाईलने ते बंद करू असा इशारा माजी सभागृह नेते श्रेयस समेळ यांनी दिला आहे.

कल्याण पश्चिमेतील महत्त्वाच्या आणि वाहतुकीच्या दृष्टीने मोठा असणाऱ्या सहजानंद चौकामध्ये होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलिसांनी काही दिवसांपासून मार्गात बदल केले आहेत. ज्यामध्ये सहजानंद चौकातून संतोषी माता रोड आणि जैन सोसायटीकडे जाणाऱ्या मार्गात बदल करून हे दोन्ही मार्ग येण्या - जाण्यासाठी एक दिशा मार्ग करण्यात आले आहेत. त्यासाठी वाहतूक पोलिसांकडून सहजानंद चौकात बॅरीकेटिंग करण्यात आले आहे. मात्र या वाहतूक बदलांना माजी सभागृह नेते श्रेयस समेळ यांनी तीव्र विरोध केला आहे.

या नव्या वाहतूक बदलांमुळे अंतर्गत भागात मोठी वाहतूक कोंडी होऊ लागल्याचे सांगत हे बदल तातडीने रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच हे वाहतूक बदल म्हणजे नागरिकांना विनाकारण वेठीस धरण्याचा प्रकार असून त्यामाध्यमातून वाहतूक पोलिस केवळ आपली जबाबदारी झटकत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. या नव्या बदलामुळे जैन सोसायटी, संतोषी माता रोड परिसरात आता मोठी वाहतूक कोंडी होऊ लागली असून स्थानिक नागरिक त्यामुळे प्रचंड हैराण झाले असल्याचेही समेळ यांनी सांगितले.

हे अनावश्यक वाहतूक बदल करण्याऐवजी आहेत त्या नियमांची अंमलबजावणी केली तरी वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होईल. ज्यामध्ये काझी हॉस्पीटल शेजारी बेतुरकर पाड्याकडे एकदिशा मार्ग, सहजानंद चौकात सिग्नल यंत्रणा, तलावाकडे जाणाऱ्या मार्गावर दुकानांबाबरील अनधिकृत पार्किंग हटवणे, अहिल्याबाई चौकातून सहजानंद चौकाकडे येणारी वाहतूक बंद करणे असे महत्त्वाचे बदल श्रेयस समेळ यांनी सुचवले आहेत. तसेच वाहतूक पोलिसांनी नविन वाहतुकीचे नियम तातडीने बंद करावे अन्यथा आम्हीच हे शिवसेना स्टाईलने बॅरीकेटिंग काढून टाकू असा इशाराही त्यांनी वाहतूक पोलिसांना दिला आहे.






# 'हर घर तिरंगा' उपक्रमातंर्गत महापालिकेतर्फे विविध कार्यक्रम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता







कल्याण : शासनाच्या निर्देशानुसार "हर घर तिरंगा" अर्थातच "घरोघरी तिरंगा" हा उपक्रम यावर्षी 2 ऑगस्ट 2025 ते 15 ऑगस्ट 2025 या कालावधीत तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. नागरिकांचे राष्ट्रध्वजाशी वैयक्तिक नाते दृढ व्हावे तसेच युवा पिढीमध्ये जाज्वल्य देश प्रेम निर्माण व्हावे या हेतूतून या अभियानातंर्गत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या अभियानाच्या अनुषंगाने महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये दि.02 ऑगस्ट 2025 रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे शालेय विदयार्थ्यांना आपला तिरंगा ध्वज कसा तयार झाला याची माहिती देण्यासाठी काल महापालिका क्षेत्रातील शाळांमध्ये तिरंगा चित्राचे मनोहारी प्रदर्शन साकारण्यात आले होते.

याच उपक्रमांतर्गत महापालिकेच्या विद्युत विभागाने देखील शहरातील प्रमुख ठिकाणी म्हणजेच चौक, महत्त्वाच्या इमारती, महापालिका इमारत, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील ओक टॉवर अशा ठिकाणी आकर्षक तिरंगा रोषणाई केल्यामुळे रात्रीच्या वेळी या इमारती नयनरम्य रंगाने नाहुन गेलेल्या दृष्टीपथास येत आहे.

त्याचप्रमाणे "हर घर तिरंगा" उपक्रमातंर्गत महापालिकेच्या विदयुत विभागामार्फत रविवार दि.10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 6.30 वाजता महापालिका मुख्यालयापासून सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी महापालिकेच्या या सायकल रॅलीमधे तसेच "हर घर तिरंगा" या उपक्रमातंर्गत दि.15 ऑगस्ट 2025 पर्यंत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येणा-या विविध कार्यक्रमांमध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# श्री रामदास गावंड सामाजिक संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : श्री. रामदास गवत्या गावंड कला, क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्था आवरे यांच्याकडून जे.एम. म्हात्रे प्राथमिक शाळा व न्यू इंग्लिश स्कूल मोरा उरण या शाळेतील पहिली ते दहावी पर्यंतच्या गरीब गरजू २५० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वह्या, व रायटिंग पॅड इत्यादी साहित्यांचे वाटप संस्थेचे अध्यक्ष संदीप गावंड केशव गावंड साईनाथ गावंड यांच्या सहकार्याने करण्यात आले.

माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर यांनी सांगितले की शाळेमध्ये गरीब गरजू विद्यार्थी मोफत शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम राबवले जातात. त्यापैकीच एक उपक्रम म्हणजे शैक्षणिक साहित्याचा वाटप. संस्थेचे सेक्रेटरी केशव गावंड यांनी ही संस्था गेली अनेक वर्षापासून विविध कार्यक्रम राबवत असून व शैक्षणिक व सामाजिक बांधिलकी म्हणून सामाजिक कार्य देखील करत आहे याची माहितीही दिली. तसेच संस्थेचे अध्यक्ष संदीप गावंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की या शैक्षणिक साहित्याचा वापर शिक्षण घेत असताना चांगल्या परीने करावा. आमची संस्था ही विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी नेहमी पुढाकार घेत असते यापुढे घेत राहील. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणात अडचणी येत असतील तर त्या दूर करू असे अभिवचन दिले.

या प्रसंगी सर्व पदाधिकारी, माध्यमिक शाळेचे चेअरमन पी. एम. कोळी, प्राथमिक शाळेचे चेअरमन चंद्रकांत कोळी मुख्याध्यापक सुधीर मुंबईकर, प्रभारी मुख्याध्यापक साईनाथ गावंड, सहाय्यक शिक्षक सुगिंद्र म्हात्रे, अनिल पाटील, मनोज म्हात्रे, स्वप्निल नागमोती, रोहिणी घरत, सौ सुनीता पाटील, सौ. राणी कदम, सौ.सुप्रिया मुंबईकर, सत्यवान मर्चंडे, सौ रुपाली चौधरी, कोल्हे मॅडम, शिक्षक, विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते. सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी तर आभार सत्यवान मर्चंडे यांनी केले.

# कल्याण मुख्य टपाल कार्यालयात गतिमान कारभारासाठी नवं सॉफ्टवेअर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता






कल्याण : भारतीय डाक ठाणे विभागात कल्याण मुख्य डाकघर ऑफिस सहित अंबरनाथ, उल्हासनगर मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील सर्व पोस्ट ऑफिस मध्ये APT IT 2.0 नवीन सॉफ्टवेअरची रोल आउट प्रक्रिया यशस्वी रित्या पूर्ण करण्यात आली. या उपक्रमाचा भाग म्हणून कल्याण हेड पोस्ट ऑफिस च्या प्रांगणात APT IT 2.0 नवीन सॉफ्टवेअरचे रोल आउटचा प्रातिनिधिक स्वरुपात उद्घाटन कार्यक्रम साजरा झाला.

प्रवर अधीक्षक डाकघर, ठाणे विभाग, के नरेंदर बाबू यांनी फीत कापून उद्घाटन केले. कल्याण मधील रहिवासी जगन्नाथ चासकर यांचे प्रथम राखी स्पीड पोस्ट बुक करून नवीन सॉफ्टवेअरमध्ये कामकाजची सुरवात झाली. या कार्यक्रमास कल्याण मधील नागरिकांनी उपस्थिती लावली. सोबत प्रवर अधीक्षक डाकघर के. नरेंदर बाबू यांच्या हस्ते श्रीगजानन विद्यालय कल्याण च्या ३० मुलीना सुकन्या समृद्धी योजनेच्या पासबुकचे वितरण करण्यात आले.

यावेळी सर्व प्री-रोल ॲक्टिव्हिटी वेळापत्रकानुसार पूर्ण करण्यात आल्या. एसएसपीठाणे विभागाने असेही सांगितले की नवीन प्रगत पोस्टल टेक्नॉलॉजी अनोंदणीकृत टपालासाठी ट्रकिंग सुविधा, सीओडीसाठी डिजिटल क्यूआर पेमेंट, डिलिव्हरी रिमार्क्सचे रिअल-टाइम अपडेशन, डिजिटल स्वाक्षरी कॅप्चर करण्याचा पर्याय, स्थान आधारित वितरण, ओटीपी/आधार आधारित वितरण, तक्रार व्यवस्थापनासाठी सपोर्ट डेस्कसह घरापर्यंत पिकअप व्यवस्था ईत्यादी साठी सक्षम करेल. कल्याण हेड पोस्ट ऑफिस येथील उद्घाटन समारंभास डाक विभागातील अनेक मान्यवर, ठाणे विभागाचे कर्मचारी आणि ग्राहकांची उपस्थिती लाभली असल्याची माहिती पोस्ट मास्टर नागेश खैरनार यांनी दिली.

# एम.एम.आर.डी.ए. व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदारांची झाडाझडती

## भिवंडी महानगरपालिका व प्रशासनाची ठेकेदारांवर करडी नजर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : आज दिनांक ०५.०८.२०२५ रोजी गणेशात्सवाच्या पार्श्वभूमीवर भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी सर्व महत्त्वाच्या गणेश विसर्जन घाटांची पहाणी केली होती. तसेच, पोलीस उपायुक्त यांनी देखील गणेश विसर्जन मार्गाचा त्यांच्या स्तरावर आढावा घेतला होता. याच अनुषंगाने आज मा. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली पोलीस उपायुक्त श्री. शशिकांत बोराटे यांचेसमवेत महानगरपालिकेचे अधिकारी, अभियंता, प्रभाग अधिकारी तसेच, एम.एम.आर.डी.ए. व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कंत्राटदार यांची बैठक घेतली.

या बैठकीमध्ये गणेशोत्सव सण अत्यंत जवळ आला असूनही, एम.एम.आर.डी.ए. व सार्वजनिक बांधकाम विभागाची रस्त्याची कामे अपुर्ण आहेत. यावर आयुक्त आणि पोलीस उपायुक्त यांनी अत्यंत नाराजी व्यक्त केली. तसेच, आयुक्तांनी सर्व कंत्राटदारांना पुढील १५ दिवसात गणेश आगमन व विसर्जन मार्गावरील सर्वच रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच, जर रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अपघात अथवा दुर्घटना घडली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी ही कंत्राटदार व संबंधित अभियंता यांची राहील असा सज्जड इशारा मा. पोलीस उपायुक्त श्री. शशिकांत बोराटे यांनी दिला.

वरील बैठकीस मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके, पोलीस सहायक आयुक्त श्री. सचिन सांगळे, शहर अभियंता श्री. जमील पटेल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. गिते. एम.एम.आर.डी.ए. चे अभियंता तसेच, रस्त्याचे कंत्राटदार उपस्थित होते.






## पुरात वाहून गेलेल्या

# मृत व्यक्तीच्या वारसांना चार लाखांची मदत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील पळू (सिंगापूर) गावातील शेतकरी कै.बाळकृष्ण यादव मोरे हे मागील महिन्यात म्हैशी चारण्यासाठी माळरानावर गेले असता नदी पात्रात एक म्हशीचे वासरू पडले असता त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात स्वतःचा तोल जाऊन नदीपात्रात वाहून गेल्याने त्यांचा 8 जुलै 2025 रोजी दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेचा सविस्तर पंचनामा मुरबाड महसूल विभागाच्या वतीने करण्यात आला होता व पुढील मंजुरीसाठी जिल्हाधिकारी ठाणे येथे पाठवण्यात आले होते.

सदर दुर्दैवी घटना मुरबाड विधानसभा क्षेत्राचे कार्यसम्राट आमदार किसन कथोरे यांच्या निदर्शनात आल्यानंतर त्यांनी तत्काळ कै.बाळकृष्ण मोरे यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी म्हणून महसूल विभागाला आदेश केले होते. त्यांच्या आदेशाची दखल घेत तहसीलदार अभिजीत देशमुख यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सतत पाठपुरावा केल्याने तातडीने या कुटुंबाला रू. 4,00,000 (चार लाख रुपयांचे) धनादेश मंजूर करून दिले आहे.

कमी वेळात प्रशासनाने या कुटुंबाला आर्थिक मदत दिल्या बद्दल आमदार किसन कथोरे व तहसिलदार अभिजीत देशमुख यांचे ग्रामस्थ मंडळ पळू यांनी आभार मानले आहेत.

# एसडब्लू कंपनीची जनसुनावणी पुढे ढकला

## पत्रकार विजय मोकल यांची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : जेएसडब्लू कंपनी डोलवी, पेण येथे धरमतर पोर्टच्या प्रस्तावित तिस-या फेजची कोक प्रकल्पासंबंधी जनसुनावणी दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. सदर प्रकल्पाच्या संदर्भात नागरिक म्हणून पत्रकार विजय मोकल यांना पर्यावरण व सामाजिक दुष्परिणाम समजून घेण्यासाठी खालील माहिती आवश्यक माहितीची मागणी केली आहे यामध्ये पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवाल, पर्यावरण मंजुरी (EC) आणि संबंधित कागदपत्रे, प्रकल्पासंबंधी इतर आवश्यक मंजुरीचे तपशील, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा आणि उपाययोजना, पर्यावरणीय व सामाजिक परिणामांचे अभ्यास अहवाल, खर्चाचा तपशील, जनसुनावणीसंबंधी कागदपत्रे.

सदर माहिती मिळवण्यासाठी दिनांक २९ जुलै २०२५ रोजी जेएसडब्लू कंपनीच्या अलिबाग गेट येथील कार्यालयात सुनिल गायकर यांच्यासह प्रत्यक्ष भेट दिली. त्यावेळी स्वागत कक्षातील महिला सुरक्षा रक्षक यांनी संबंधित विभागात संदेश दिल्यानंतर तेथील महिला कर्मचारी येऊन अर्ज घेऊन गेल्या. थोड्यावेळाने साहेबांचा फोन लागत नाही थोडे थांबा असे सांगितले. त्यानंतर कुंदन गद्रे हे अधिकारी आले व त्यांना वरील विषयां बाबत पत्र दिले असता कुंदन गद्रे यांनी असे कोणतेही पत्र घेण्याची 'प्रोव्हिजन नाही' असे सांगत पत्र स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला. ही बाब पर्यावरण जनसुनावणी प्रक्रियेतील पारदर्शकतेवर आणि नागरिकांच्या हक्कांवर थेट आघात करणारी आहे. यासंदर्भात पत्रकार विजय मोकल यांनी मुख्यमंत्री, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हाधिकारी, MPCB, जेएसडब्लू फौंडेशनच्या संगीता जिंदाल मॅडम, प्रांताधिकारी, तहसीलदार, वडखळ पोलीस ठाणे यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. सदर बाब अत्यंत गंभीर असून, जनसुनावणीपूर्वी नागरिकांना माहिती मिळवण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण कंपनीकडून माहिती न देणे ही पर्यावरण जनसुनावणी प्रक्रियेच्या पारदर्शकतेला हरताळ फासणारी कृती आहे. यामुळे नागरिकांना हरकती घेण्यासाठी पुरेशी माहिती मिळत नाही आणि जनहित धोक्यात येतो. तसेच एक नागरी म्हणून माझ्या हक्कावर गदा आली आहे. असे विजय मोकल यांनी सांगितले.

याबाबत JSW कंपनीकडून संबंधित सर्व माहिती सार्वजनिकरीत्या उपलब्ध करून देण्याचे आदेश द्यावेत. कंपनीच्या सदर अधिकाऱ्याने माहितीबाबत पत्र घेण्यास नकार दिल्याबाबत चौकशी करावी. पुढील जनसुनावणीमध्ये नागरिकांना वेळेत माहिती मिळेल, याची हमी घ्यावी. संबंधित अधिकाऱ्यांना सूचना द्याव्यात की, नागरिकांनी दिलेली लेखी माहिती अगर तक्रार कंपनी नाकारू शकत नाही. ऑगस्ट महिन्यात अनेक सण आहेत. तसेच गणपती बाप्पाचे आगमन याचं काळात होणार आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिक उत्सवाच्या धामधुमीत असल्याने सदर जनसुनावणी पुढे ढकलण्यात यावी जेणेकरून नागरिकांना हरकती घेण्यास वेळ मिळेल. अशी मागणी त्यांनी लेखिपत्राद्वारे केली असून याबाबत मानवी हक्क आयोगाकडे दाद मागणार असल्याचे विजय मोकल यांनी सांगितले.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.